आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र.३०

# आदिवासी भागात कोविड-१९ च्या काळातील मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत विषयमित्रांची भूमिका

# The Role of Subject Friends in the Learning Process of Tribal Areas in Covid-19 Situation

**प्रस्तावना -**

"शिक्षण हे एकमेव उन्नतीचे साधन आहे" असे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. कोविडमुळे मात्र शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झाली होती. फक्त शिक्षणच नव्हे तर कोविडने सर्व क्षेत्रात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. संपूर्ण जगावर ह्या महामारीचा परिणाम झाला आहे त्याला भारत देश देखील अपवाद नाही. मार्च 2020 पासून काही कालावधीसाठी संपूर्ण भारतात लॉकडाऊन करण्यात आले होते, त्यामुळे सर्व शैक्षणिक महाविद्यालये , शाळा बंद झाल्या. शिक्षण निरंतर सुरू राहावे यासाठी ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडण्यात आला. सुरुवातीला ऑनलाइन शिक्षण हा विचार न पटणारा व न पचणारा वाटत होता. प्रत्येकाकडे ऑनलाईनची सुविधा असेलच असे नाही, त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाला अजून इतर काय पर्याय असू शकतात यावर परिस्थितीनुरूप मार्ग सापडत गेले. आपल्या महाराष्ट्रात ऑनलाइन शिक्षणासाठी विविध प्रयत्न शासन स्तरावरून झालेले आहेत.

१. शाळा बंद पण शिक्षण आहे :- या अभ्यासमालेच्या सहाय्याने दीक्षा App आधारित स्वयंअध्ययन उपक्रम आजतागायत सुरु आहे.
२. जिओ टीव्ही - जिओ टी व्ही च्या माध्यमातून इयत्ता तिसरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम प्रसारित करून सुविधा उपलब्ध केल्या होत्त्या.
३. जिओ सावन :- ह्या रेडिओ वाहिनीवर देखील शैक्षणिक उपक्रम प्रसारित करण्यात आले होते .
४. डी डी सह्याद्री वाहिनी द्वारे शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रक्षेपण :- या शैक्षणिक कार्यक्रमातून इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.
५. शिक्षकांना घरातूनच विद्यार्थ्यांना अध्यापन करता यावे यासाठी गूगल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती व तसे प्रशिक्षण शिक्षकांसाठी नियोजित केले.

६. युट्युब वर शैक्षणिक साहित्याचे व्हिडिओ अपलोड करण्यात आले.
७. विद्यार्थ्यांचा मागील शैक्षणिक वर्षातील अध्ययन ऱ्हास भरून काढण्यासाठी इयत्ता निहाय व विषय निहाय ब्रिज कोर्स निर्माण करण्यात आला.
८. ऑनलाइन समुपदेशन व महा करियर पोर्टल वरून मार्गदर्शन करण्याची सुविधा देण्यात आली.
९. स्वाध्याय उपक्रम व्हॉट्सऍप माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.
असे असले तरी दऱ्याखोऱ्यात शिकणारी मुले जिथे इंटरनेटची कोणतीही सुविधा नाही या भागातील मुलांचे कसे शिक्षण होईल हा प्रश्न नेहमीच शिक्षकांसमोर येत होता.

TRAI अर्थात भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण नुसार 82.53 कोटी इंटरनेट ग्राहक आहेत. ग्रामीण भागात 302 दशलक्षाहून अधिक लोक इंटरनेट वापरत आहेत.तर शहरी भागात 502 दशलक्षाहून अधिक आहे. (संदर्भ :- प्रभात वृत्तसेवा 6 ऑगस्ट 2021) यावरून ग्रामीण भागात इंटरनेट वापर संख्या कमीच आहे. त्यातल्या त्यात आदिवासी डोंगर-दऱ्या असलेल्या भागात हे प्रमाण कमी अधिक दिसून येते परिणामी अशा ठिकाणी काही स्वरूपात ऑनलाईन शिक्षणाला मर्यादा येतात. कोविड 19 मुळे संपूर्ण जगभरात लॉकडाऊन झाले आणि विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण होऊ नये म्हणून शाळा महाविद्यालये बंद करण्यात आली . परीक्षा रद्द करण्यात आल्या.कोरोना मुळे 188 देशातील 1.5 अब्ज पेक्षा अधिक जवळपास 91 टक्के विद्यार्थ्यांची शाळा बंद झाली. शाळा बंद झाली तरी शिक्षण मात्र सुरू राहिले पाहिजे या दृष्टिकोनातून जगामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत विविध पर्याय विद्यार्थ्यांना खुले करण्यात आले व ऑनलाइन शिक्षण परिणामकारकपणे देण्यासाठी विविध राज्य सक्रियपणे कामाला लागले. त्यात आपला महाराष्ट्र देखील अग्रेसर आहे.

महाराष्ट्र राज्यात देखील लर्निंग फ्रॉम होम ही संकल्पना राबविणे बाबत परिपत्रक काढण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मार्फत दिनांक 28 एप्रिल 2020 रोजी शासन परिपत्रक (क्रमांक 2020/प्र.क्र.84/एसडी-6) घरी राहून शिक्षण ही संकल्पना राबविण्यासाठी शासनाने अनेक वेळा खालील संसाधनांची माहिती उपलब्ध करून दिली आहे.त्यात प्रामुख्याने सर्व ई –लर्निंग संसाधनांचा परिचय करून दिला ज्याच्या वापराने विद्यार्थी शिक्षणातील अडचणी कमी होण्यास मदत होईल यासाठी प्रयत्न करण्यात आले.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे :-**

1) कोरोना काळातील शैक्षणिक क्षेत्रात विषय मित्र संकल्पना समजून घेणे.
2) कोरोना काळातील शैक्षणिक क्षेत्रात विषय मित्र संकल्पना राबवणाऱ्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास करणे
3) कोरोना काळातील शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने समजून घेऊन विषयमित्रांच्या कामकाजाबाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टीकोन विकसित करणे.

**विषय मित्र संकल्पना –**

शिक्षकांनी शिकविलेला घटक आपल्या मित्राने समजून सांगितल्यावर सहजतेने समजतो . वयाचे व लहान मोठेपणाचे बंधन तिथे संपलेले असते व या माध्यमातून मुलांचे शिकणे हे सहज आणि सोपे होते.

आदिवासी दुर्गम भागात सुद्धा जिथे ऑनलाइन शिक्षण पोहोचू शकत नाही अशा ठिकाणी शाळा बंद पण शिक्षण सुरू आहे या अंतर्गत ऑनलाईन शिक्षणाला जरी मर्यादा असली तरी विद्यार्थ्यांचे शिकणे होण्यासाठी आपल्याला काय करता येऊ शकते या विचाराने प्रेरित होऊन विषय मित्र या संकल्पनेचा जन्म झाला. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी गावातील स्थानिक डी.एड.,बी.एड., पदवीधर, पदवीत्तर विद्यार्थी, शिक्षणतज्ञ, हुशार विद्यार्थी, विद्यार्थी हित जोपासणारे पालक यांच्या मदतीने मुलांचे शिकणे सुलभ होते. या सर्वांना आपण विषय मित्र म्हणून संबोधू शकतो. विषय मित्रांनी आपणास जो विषय आवडेल,त्या विषयावर सहाध्यायी मुलांना अध्यापन करायचे. विशेष म्हणजे कोविड नियमांचे पालन करून झाडा खाली, मैदानात, चावडी, गल्लीत मोकळया जागी, मोठ्या घरातील मोठे ओटे, शाळांचे ओटे, मंदिरे, जिथे मुलांना बसायला मोकळी जागा मिळेल अशी जागा शोधून विद्यार्थ्यांचे शिकणे कोविड मध्येही निरंतर चालू राहीले.खरे पाहता विषय मित्र ही संकल्पना कोविड परिस्थितीतून जन्माला आलेली आहे. या आधीही मुले सहाध्यायीची मदत म्हणजे मित्रांची मदत घेऊन अभ्यास करत होते परंतु त्यात अधिक सुलभपणे समजावून सांगण्याबाबत मर्यादा होती. परंतु ऑनलाईन शिक्षणाची समस्या दूर करण्यासाठी दुर्गम शाळांमध्ये विषय मित्र संकल्पना उदयास आली.

**कोविड काळातील शैक्षणिक क्षेत्रातील विविध आव्हाने –**

कोविडचा प्रादुर्भाव हा फक्त शिक्षण क्षेत्रावरच नाही तर सर्वच स्तरावर झाला. परंतु आपण ह्या सर्व परिस्थितीला सामोरे गेलो तेव्हा परिस्थितीनुरूप अनेक छोटी मोठी आव्हाने आपल्याला दिसून आलेली आहेत. कोविड प्रसारामुळे सर्व शाळा महाविद्यालयांमधील अध्यापनाचे काम बंद झाले. ही परिस्थिती वाढत राहिली त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचे अध्ययन, अध्यापन, परीक्षा, करियर नियोजन इत्यादी विविध बाबतीत अनेक आव्हाने उभी राहिली. संपूर्ण भारतात शाळा जरी बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू राहावे यासाठी ऑनलाईन च्या बाबतीत विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या परंतु असे असले तरी ज्या भागात इंटरनेटची सुविधा ही अशा आदिवासी दुर्गम भागांमध्ये शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत अनेक आव्हाने ही शाळांना, शिक्षकांना, विद्यार्थ्यांना,पालकांना शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना दिसून आलेली आहेत.

**कोविड काळातील शैक्षणिक क्षेत्रातील विविध आव्हाने -**

| अ.क्र | शिक्षक | विद्यार्थी | पालक |
|---|---|---|---|
| 1) | शाळा बंद, संपूर्ण लॉक डाऊन मुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. | कोरोना काळात शाळा, महाविद्यालये बंद होती अशा परिस्थितीत मुलांनी शिकायचे कसे हा मोठा प्रश्न होता. | ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत पुरेसे नेटवर्क नसल्यामुळे ऑनलाईन शिक्षण कसे होईल याची चिंता सतावत होती . |
| 2) | शाळा बंद पण शिक्षण सुरू या अंतर्गत ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय खुला परंतु आदिवासी दुर्गम भागात नेटवर्कची समस्या हे आव्हान कायम होते. | ऑनलाईन माध्यमातून सर्वच मुले शिकू शकतात हे जरी खरे असले तरी ऑनलाइन शिक्षणाची सर्व साधने आदिवासी दुर्गम भागातील सर्व मुलांकडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मुलांच्या शिकण्या अनेक अडचणी हे आव्हान. | ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी चे पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्या कारणाने अनेक आव्हानांना पालक विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत होते. |

| | | | |
|---|---|---|---|
| 3) | ऑनलाइनच्या विविध पर्यायांची व्यवस्था एका ठिकाणी केली तर सोशल डिस्टंसिंग नियमांमुळे एकत्र येऊन शिकण्याला मर्यादा | 3) या कोविड काळात अनेक आव्हाने विद्यार्थ्यांनाही दिसून आलेली आहे शाळा बंद असल्यामुळे सारखे घरी राहून मुले कंटाळली व त्यांची चिडचिड वाढली. | मुले जास्त वेळ मोबाइल वापर करण्यात घालवत होती. |
| 4) | ऑनलाइन पद्धतीने कोणत्या माध्यमातून, ऑफलाइन पद्धतीने कोणत्या माध्यमातून मुलांना शिकवता येईल हे आव्हान कायम होते. | शाळा बंद पण शिक्षण सूरु म्हणजे शिकणे कसे सुरू ही चिंता विद्यार्थ्यांना भेडसावत आहे. | मुले पालकांचे ऐकत नाही हे एक आव्हान पालकांना होते. |
| 5) | शाळा बंद मुळे कोरोनाच्या महामारी मुळे स्वतःच्या व्यावसायिक सेवेला कार्यरत ठेवण्यासाठीचे आव्हान. | शिक्षकांचे मार्गदर्शन कसे मिळेल, कठीण विषय आपण कसे समजून घ्यावे हे आव्हान मुलांसमोर होते. | विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशी होणार हे आव्हान होते. |
| 6) | शाळा बंद पण शिक्षण सुरू ही नवी पद्धत यात शिक्षकांनी मुलांना समजून घेण्याच्या बाबतीत अडचणी आल्या, कारण प्रत्यक्ष संवाद नव्हता. | 6)आपल्या करिअर नियोजनाबाबत अनेक प्रश्नचिन्ह विद्यार्थ्यांच्या मना मध्ये निर्माण झाले होते. | मुलांच्या करिअरची चिंता, मुलांना अतिरिक्त ताण पडणार नाही ही चिंता होती |
| 7) | पालक,विद्यार्थी,शाळा व्यवस्थापन समिती ,इतर घटक यांना ऑनलाईन शिक्षणाबाबत सकारात्मक कसे करावे हे आव्हान | ऑनलाईन शिक्षण घेण्याची विद्यार्थ्यांना सवय नसल्यामुळे ऑनलाइन शिक्षणाची गोडी विद्यार्थ्यांनां लागत नव्हती. | शाळा पुन्हा सुरू झाल्या तर मुलांना शाळेत पाठवावे का?कोरोना काळात मुले सुरक्षित कशी राहतील हे आव्हान |
| 8) | शिकविण्याचे कोणते माध्यम वापरावे त्यासाठी कोणते पर्याय आपल्याला शोधता येईल हे आव्हान | कोविड काळात विद्यार्थ्यांना एकटेपणाची भावना निर्माण झाली होती. मित्र शालेय परिसर यापासून मुले दूर गेली. | ऑनलाइन शिक्षणामुळे मुलांचे भवितव्य काय असेल याबाबत पालकांच्या मनात प्रश्नचिन्ह होते. |
| 9) | पारंपारिक अध्यापन पद्धती मर्यादा असल्यामुळे नवीन पद्धतीत वापरण्याचे आव्हान | वर्तमानपत्रात टीव्ही ,परिसरातील घडामोडी यामुळे मुलांच्या मनात प्रचंड भीती निर्माण होताना दिसली कोविडची निरर्थक भीती मुलांना वाटत होती. | कोरोनाच्या काळात आपली मुले सुरक्षित राहतील की नाही हे देखील एक आव्हान पालकांना होते. |
| 10) | गावकरी, पालक यांच्याशी कोविड महामारीच्या काळात शिकवण्याच्या नवीन पद्धती बदलण्याची गरज निर्माण झाली, याबाबतपालक,विद्यार्थी,शाळा व्यवस्थापन समिती ,इतर घटक | ऑनलाईन शिक्षणातील अडचणी पाहता अश्या परिस्थितीत जर परीक्षा झाल्या तर परीक्षा कशी द्यायची हा प्रश्न ऑनलाईन साधने उपलब्ध नसलेल्या मुलांना भेडसावत होता. | कोविडची अनाठायी भीती पालकांना वाटत होती. |

| | | | |
|---|---|---|---|
| | यांना सकारात्मक कसे करावे हे आव्हान | | |
| 11) | शिकविण्याचे कोणते माध्यम वापरावे त्यासाठी कोणते पर्याय आपल्याला शोधता येईल हे आव्हान | 10 वी व 12 वी च्या मुलांना पालकांच्या अपेक्षांचे ओझे कसे पूर्ण करावे हे ही आव्हान मुलांसमोर होते. | कोविडच्या काळात किती काळ शाळा बंद राहतील ,शाळा कधी सुरू होतील याबाबत अनेक प्रश्न पालकांच्या मनात भेडसावत होते. |

## यशोगाथा

## जिल्हा परिषद शाळा ,धवळी विहीर,

## तालुका तळोदा,जि.नंदुरबार

## श्री.प्रतापसिंग भांगा वळवी (मुख्याध्यापक )

शाळेतील चिमुकल्यांचा किलबिलाट, दररोजची शाळेची ओढ, गावकरी, पालक व सहकाऱ्यांची आनंदमय भेट, विद्यार्थ्यांसोबत होणारी दररोजची आंतरक्रिया अशा शालेय वातावरणाला अचानक पणे जागतिक कोरोना महामारी मुळे खिळ बसली. अनपेक्षितपणे सर्वच शिक्षण प्रवाह थांबले. जिल्हास्तर व तालुका स्तर नेतृत्व यांनी ऑनलाइन शिक्षणासाठी तालुक्यातील शिक्षकांचा व्हाट्सअप ग्रुप बनविण्याबाबत सूचना दिल्या. पालकांचे मोबाईल नंबर मिळवून विद्यार्थी व्हाट्सअप ग्रुप बनविले. ऑनलाइन पद्धतीने शिक्षण विद्यार्थ्यां पर्यंत पोहचविले. शिक्षण प्रवाह खंडित होऊ नये यासाठी,मुख्याध्यापक , शिक्षक सातत्त्याने प्रयत्न करीत होते. आम्हा शिक्षकांचा पालक परिचय पालकांना आधी पासून होताच परंतु पालकांचे दूरध्वनी क्र.नव्हते म्हणून पालक वर्गापर्यंत अपेक्षित रित्या पोहोचता येत नव्हते. परंतु ते काम केले. संपूर्ण महाराष्ट्रात कोविडच्या काळात मुले शिकण्यासाठी विविध ऑनलाइन उपक्रम सुरु होते. आमची शाळा आदिवासी दुर्गम भागात असल्यामुळे नेटवर्क ची अडचण जाणवत असे. अश्या परीस्थितीत काय करता येईल हा प्रश्न नेहमी आम्हाला भेडसावत होता. मुले देखील सारखे विचारत, शाळा कधी सुरु होणार.? विद्यार्थी शिक्षण नेहमी चालू राहावे या विचाराने मन स्वस्थ बसत नव्हते. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर शिक्षकांच्या मदतीने अजून काही पालकांचे मोबाईल क्रमांक मिळवले. व्हाट्सअप द्वारे ऑनलाइन शिक्षणास सुरुवात केली मात्र यातूनही पूर्ण समाधान लाभले नाही.परंतु अनेक आव्हाने आम्हाला भेडसावत होती.

**आव्हाने -**

1) पालकांजवळील अँड्रॉइड मोबाईलची संख्या कमी होती.

2) व्हाट्सअप किंवा डिजिटल ॲप/ साधने वापरण्या संदर्भातील अज्ञान

3) ऑनलाइन शिक्षणासंदर्भात पालक तसेच शिक्षक बंधू भगिनी मध्ये सुद्धा असलेली संभ्रमावस्था

4) दीक्षाॲप, टिलीमिली, टीव्हीवरील कार्यक्रमतसेच इतर सर्व ऑनलाईन कार्यक्रमास पालकांचा मिळणारा अल्प प्रतिसाद.

5) पालक प्रचंड चिंताग्रस्त होती कारण सारखी मोबाइलची मागणी मुले करीत असत.

मात्र प्रत्यक्ष गृहभेटी तसेच दीक्षा ॲप, टीली मिली सारख्या कार्यक्रमांची पालकांना माहिती देत असताना आपल्याला ऑनलाईन साधनांचा मुल शिकण्यासाठी परिणामकारक वापर कसा होतो हे आम्ही समजून सांगत होतो परंतु नेटवर्क ची समस्या, एकच फोन, पालकांना सारखे कामानिमित्त बाहेर जाणे, मोबाईलला नेट असणे त्यामुळे मुलांचे अपेक्षित शिक्षण ऑनलाईन स्वरूपात होत नव्हते .ह्या सर्व परिस्थितीचा विचार करता काय येईल हा प्रश्न सारखा भेडसावत होता. एके दिवशी गावात विद्यार्थी गृह भेटी करीत असताना गीता पावरा या शाळेच्या माजी विद्यार्थिनीची भेट झाली. तिच्याशी विचार विनिमय करीत असताना तिच्याजवळ आम्ही आमची कैफियत मांडली. तू आम्हाला मदत करू शकतेस असे सांगून बीएड झालेल्या दीदीने विद्यार्थ्यांना दररोज शिकविण्यास होकार दिला. व्हाट्सअप द्वारे दीदीला अभ्यासक्रमाबद्दल, घटकांबद्दल माहिती दिली. इथून सुरू झाला एका विषय मित्राचा प्रवास. गीता दीदीने अभ्यासक्रम सोबतच विविध शैक्षणिक साहित्य व नवनवीन उपक्रम घेऊन आपल्या घराच्या ओट्यावरच विद्यार्थाच्या शिक्षणाची सुरुवात केली व विषय मित्र संकल्पनेची मुहूर्तमेढ केली. दीदीची सुरुवात पाहून गावातील ज्येष्ठ नागरिकांनी तिला लागणारे शैक्षणिक साहीत्य आणून दिले. तिला फळा घेऊन दिला, शाळेमार्फत शैक्षणिक साहित्य, गोष्टींची पुस्तके, अभ्यासक्रमची पुस्तके ओट्यावर ठेवण्यात आली. याप्रमाणेच प्रत्येक गल्लीतील माजी विद्यार्थांच्या मदतीने लहान बालकांना शिकवण्यास सुरुवात केली. एका मदतीच्या हाताने अनेक विषय मित्र पुढे आले व विद्यार्थांचे जीवन फुलू लागले. पुस्तक वाटप, शालेय पोषण आहार वाटप, इतर योजना राबवताना पालकांसोबत प्रत्यक्ष संवाद साधून विद्यार्थ्यांना गीता दीदी कडे, माजी विद्यार्थ्यांकडे जाण्यास सांगून अभ्यास दररोज करून घेण्याबाबत आवाहन करण्यात आले. शाळेतील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक बंधू भगिनी यांच्यात नियमितपणे चर्चा होत असताना अनौपचारिक ऑडियो(ध्वनिफीत) वापर करण्याची नवीन योजना समोर आली तसेच .ध्वनिफीत करणे निश्चित झाल्याने आम्ही शालेय कविता ,प्रार्थना, समूह गीते, पाढे, अंक, वार महिने इतर घटकांसह दोन तासाची ध्वनिफीत तयार केली. ध्वनिफीत विद्यार्थ्यांना नियमीतपणे ऐकवण्या बाबत व्हाट्सअप वर पालकांना आवाहन करताच श्री जितेंद्र पावरा यांनी तात्काळ होकार कळवला. त्यांच्या मदतीने गावातील मुख्य चौकात ऑडिओ दररोज लावण्यात येत असे, त्याचा परिणाम म्हणून विद्यार्थी कविता गायन, पाठांतर यावर विलक्षण प्रभाव झाल्याचे पालकांकडून कळाले. गावातील चौकात मुले एकत्र येत असल्याने गावातील संस्थांकडून सॅनिटायझर व मास्क ची उपलब्धता करून देण्यात आली. सोबत तत्कालीन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री ओम प्रकाश पावरा यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद व प्रोत्साहन मिळत होते.

पुढील वाटचाल करत असताना पालक श्री युवराज वसावे यांनी विद्यार्थी गर्दी टाळावी याकरिता गीता दीदी प्रमाणेच स्वतःच्या घरी शिकवण्यास सुरुवात केली तसेच ऑडिओ मागणी केली. त्यामुळे विद्यार्थी गर्दी कमी होण्यास मदत होते हे लक्षात आल्याने गावातच शैक्षणिक ओटे तयार करण्याची नवीन कल्पना पुढे आली. गावातील श्री नागेश पावरा, श्री सोमलाल पावरा, श्री भावसिंग पावरा, युवराज वसावे यांच्या घराच्या ओट्यांवर विद्यार्थी एकत्र येऊ लागलेत व गावातील अनेक विषय मित्र मुलांचा अभ्यास घेऊ लागले.शिक्षक नियमितपणे विद्यार्थी ओट्यावर भेट देणे, विद्यार्थ्यांचा अभ्यास तपासणे, शैक्षणिक तक्ते लावणे ,ओट्यावर शिकवणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, पालकांना गृहभेटी देऊन गीता दिदी कडे व युवराज वसावे सरांकडे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पाठविण्यासाठी पालकांना प्रोत्साहित करत होते. गीता दीदी सोबतच कृष्णा पावरा यांनी देखील घरातच शिकविण्यास सुरुवात केली. श्री जितेंद्र पावरा यांनी स्वतःच्या कल्पकतेने

ध्वनिफितीमध्ये विद्यार्थी आवडीनुसार बदल केले. युवराज वसावे यांच्या कल्पनेतून छोट्या स्पीकर द्वारे ऑडिओ उपक्रम गावातील चौकाचौकांमध्ये वाजू लागले.



तळोदा : बोलक्या भिंती पाहताना गावातील मुले. दुसऱ्या छायाचित्रात स्पिकरद्वारे शैक्षणिक ऑडिओ क्लिप ऐकताना विद्यार्थी.

# चौकाचौकांत स्पिकरवर अभ्यासाचे धडे

## धवळीविहीर येथील शिक्षकांचा उपक्रम; 'व्हॉट अॅन आयडिया सरजी' म्हणत विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**सम्राट महाजन : सकाळ वृत्तसेवा**

तळोदा, ता. ३ : 'इच्छा तिथे मार्ग' या म्हणीनुसार धवळीविहिर (ता. तळोदा) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी कोरोना काळात शाळा जरी बंद असली तरी विविध अभिनव उपक्रम राबवित आलेल्या समस्यांवर मात करीत आहेत. विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी चौकाचौकात स्पिकरवर अभ्यासाची धडे गिरवली जात आहे. विद्यार्थी, पालकवर्ग देखील 'व्हॉट अॅन आयडिया सरजी' म्हणत शिक्षकांचा उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

कोरोनामुळे शाळा बंद आहेत परंतु शिक्षणाची प्रक्रिया पूर्णपणे बंद होऊ नये व विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची रुची टिकून राहावी यासाठी शिक्षण विभाग मुख्यतः ऑनलाइन शिक्षणासह अनेक उपाययोजना राबवित आहे. पण ग्रामीण भागात ऑनलाइन शिक्षण ही संकल्पना प्रत्यक्षात राबवितांना अनेक अडचणी येत आहेत, या भागातील बहुतांशी मुलांच्या पालकांकडे अँड्रॉइड मोबाईल नाहीत किंवा मोबाईल आहेत तर त्याला इंटरनेटची रेंज नाही. यावर उपाय म्हणून धवळीविहिर (ता. तळोदा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी ध्वनिफिती द्वारे विद्यार्थ्यांना अनौपचारिक पणे शिक्षणाचा प्रवाहात आणण्याचे ठरविले आहे. यासाठी शाळेतील शिक्षक अनिल सोनवणे यांनी इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या कविता, समूह गीते, पाढे, मराठी व इंग्रजी अंक, बारा महिने, सात वार सोबत प्रतिज्ञा, प्रार्थना, प्रास्ताविक व इतर घटकांची दोन तास सतरा मिनिटांची ऑडिओ क्लिप तयार केली आहे. धवळीविहिर येथील मुख्य चौकात एक मोठा स्पिकर ठेवून त्याद्वारे ती क्लिप विद्यार्थ्यांना ऐकविण्यात येत आहे, विद्यार्थीही कोरोनाचा पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करीत ती क्लिप आवडीने श्रवण करीत आहेत. पालकवर्ग, गावकरी, मुख्याध्यापक प्रताप वळवी, केंद्रप्रमुख अलका जयस्वाल व गट शिक्षणाधिकारी शेखर धनगर यांनी उपक्रमाचे कौतुक केले आहे.

**विविध उपक्रम राबवितांना माजी विद्यार्थिनी गीता पाडवी, जितेंद्र पावरा, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश पावरा आदींची मदत मिळत असून गावातील विद्यार्थी, पालकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षणाचा मुख्य प्रवाहात टिकून ठेवण्यात यशस्वी होत आहोत याचा आनंद आहे.**

**–अनिल सोनवणे,** शिक्षक, जि. प. शाळा, धवळीविहिर

**चौकात लावणार लहान स्पिकर**

यापुढे गावांतील इतर चौकात देखील लहान- लहान मोबाईल स्पिकर लावण्यात येणार असून त्यासाठी लोक सहभागातून स्पीकर खरेदी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांपर्यंत अनौपचारिकरीत्या पोहचून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवण्याचा हा अनोखा प्रयत्न नक्कीच वाखाणण्याजोगा आहे.

**गावांतील भिंती ज्ञानाने रंगल्या**

सामान्यतः गावातील सार्वजनिक ठिकाणीच्या भिंती तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी रंगलेल्या असतात. पण धवळीविहिर गावांतील भिंतींवर स्वतः शिक्षक अनिल सोनवणे यांनी गणिताच्या संकल्पना, विविध पक्षींची व फळांची इंग्रजी भाषेतील नावे व त्यांचा अर्थ सुबक अश्या चित्रांसह रेखाटला आहे. यामुळे गावांतील भिंती बोलक्या झाल्या असून यामुळे गावातील मुलांचा [illegible] होत आहे.

**छोट्या स्पीकर द्वारे ऑडिओ उपक्रम गावातील चौकाचौकांमध्ये**

विद्यार्थी एकत्र येतात अशा ठिकाणी शैक्षणिक भित्तिचित्रे रंगविण्याची नवीन कल्पना समोर आली व श्री अनिल सोनवणे सर यांनी रंगकाम केले. तर भिंतीवर प्रायमर मारणे ,मदत करणे इतर कामात शिक्षकांनी त्यांना मदत केली. चित्रांमुळे विद्यार्थी स्पेलिंग पाठांतर याबाबत सकारात्मक परिणाम दिसून आला.





**शैक्षणिक भित्तिचित्रे रंगविणे उपक्रम**

या सर्वांचा परिणाम म्हणून विद्यार्थी सकाळी आठ ते दहा वाजेपर्यंत ऑडीयो ऐकणे, दहा ते बारा या वेळेत गीता दीदी व इतर विषय मित्रांकडे अभ्यास करणे, सायंकाळी चार ते सहा परत ओट्यावर अभ्यास करणे या पद्धतीने व्यस्त राहू लागले. दरम्यान ह्याच काळात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार मार्फत पुरवण्यात आलेल्या स्वाध्याय पुस्तिकांचा देखील खूप उपयोग झाला . प्रत्येक मुलाकडून हे स्वाध्याय सोडवून घेतले.




**डाएट नंदुरबार मार्फत पुरवण्यात आलेल्या स्वाध्याय पुस्तिकांचा सराव**

या पद्धतीने विषयमित्रांची साथ, शिक्षकांचे प्रयत्न, शालेय व्यवस्थापन समितीचे सहाय्य, केंद्रप्रमुख तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय अधिकारी यांचे नियमित मार्गदर्शनामुळे शाळेतील ६० ते ७० टक्के विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात निरंतर राहीले. अपेक्षित गुणवत्ता विद्यार्थांनी प्राप्त केली. हे सर्व शक्य झाले ते केवळ विषयमित्र यांच्यामुळे विद्यार्थांना अवांतर नैतिक मूल्य रुजविण्यासाठी अनेक उपक्रम विषय मित्र राबवित आहेत. जसे शैक्षणिक ओट्यावर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, शिक्षक दिना सारखे दिवस साजरे करणे, चित्रकला, निबंध, भाषण इतर स्पर्धा आयोजित करणे.

निश्चितच गावातील लहान विद्यार्थ्यांपासून, विषयमित्र, शालेय व्यवस्थापन समिती, गावकरी, मुख्याध्यापक व पूर्ण शिक्षक वृंद तसेच अधिकारी वर्गाचे अनमोल मार्गदर्शन याचा परिणाम म्हणून कोरोना कालावधी नंतर सुरू होणाऱ्या नियमित शाळेत देखील ६० ते ७० टक्के विद्यार्थी अगदी नियमित शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक प्रवाहात असल्याचे दिसून आले. कोरोना कालावधीनंतर विद्यार्थांचे नुकसान झालेले आहेच पण विषय मित्रांच्या अनमोल साहाय्याने विद्यार्थी शिक्षण प्रवाह सुरू ठेवता आला.ह्यात ऑनलाइन शिक्षणाचा वाटा देखील आहे. विद्यार्थी शिक्षण निरंतर सुरु राहावे यासाठी धवळीविहीर जिल्हा परिषद शाळा अविरत कार्य करत आहे.

**यशोगाथा**
**जिल्हा परिषद शाळा,**
**शेलवाई, ता.तळोदा ,जि.नंदुरबार**
**श्री.दशरथ करांडे,(मुख्याध्यापक)**

कोरोना आपत्तीमुळे मानवी जीवनाच्या सर्व घटकावर अन क्षेत्रावर होत असणाऱ्या दूरगामी परिणाम आपण पाहत आहोत, अनुभवत आहोत आपल्या शिक्षण प्रवाहात यामुळे गेले अनेक दिवस अडसर निर्माण होवून शिक्षण संक्रमण कार्यात मर्यादा येत आहेत. पर्यायाने ही गंभीर परिस्थिती पाहता आपण आज काळानुरूप अन परिस्थितीनुरूप वेगळी भूमिका करणे ही काळाची गरज बनली आहे. 'शासनाने देखील शाळा बंद ठेवणे' अपरिहार्य झाले असेल तरीही विद्यार्थांचे शिक्षण कसे चालू ठेवता येईल? या साठी विविध प्रयत्न आणि कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले आहे. याशिवाय शिक्षकांना शिक्षण चालू ठेवण्यासाठी स्वयंस्फूर्तीने विविध प्रयत्न आणि नवोपक्रम आपल्या शाळेत करण्यासाठी प्रयत्न केले आहे. या लॉकडाऊन च्या काळात एक प्रभावी माध्यम म्हणून आम्ही नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला. **माझं घर व अंगण हीच माझी शाळा** हे जरी नाव असले तरी ह्यात विषय मित्राची भूमिका फार महत्वाची आहे.

मागील मार्च 2020 पासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन झाले अन् ऑनलाइन शिक्षण सुरु झाले. शासनाने ऑनलाईन शिक्षणासाठी विविध प्रयत्न केले,परंतु जिथे पालकांना रोजच खाण्याचा प्रश्न सोडवावा लागतो तिथे हे प्रयत्न फारसे लागू होत नव्हते, सर्व मुलांपर्यंत पोहचण्यासाठी काय उपाययोजना करता येईल यासाठी सदर नाविन्यपूर्ण उपक्रम आखणी करून राबविला. ऑनलाइन च्या माध्यमातून शिक्षण 40% मुलांपर्यंत पोहचत होते. १००% मुलांपर्यत पोहचण्यासाठी गावातील शिक्षित मुले,शिक्षण तज्ञ,ग्रामस्थ,वरच्या वर्गातील मुले ह्यांची मदत घेऊन सर्व मुलांना शिकण्याच्या प्रवाहात आणले. आम्ही सर्व व गावातील शिक्षण प्रेमी मनेश वळवी, अविनाश पाडवी, सुजल पाडवी, विनायक पाडवी या सर्वांनी चर्चा करून १०० टक्के मुलांपर्यत पोचण्यासाठी **माझ घर व अंगण हीच माझी शाळा** हा उपक्रम सुरु केला.



**माझ घर व अंगण हीच माझी शाळा -उपक्रम क्षणचित्रे**

विद्यार्थी, मित्र, पालक यांची विषय मित्र म्हणून नेमणूक करणे, वारानुसार विषयाच्या अभ्यासाचे नियोजन याप्रमाणे विषयमित्रांच्या कामाचे नियोजन झाले. त्यात रविवार-मराठी, सोमवार- गणित, मंगळवार-विज्ञान व परिसर अभ्यास, बुधवार- इंग्रजी, गुरुवार- सहशालेय,कविता,गाणी, शुक्रवार- गणित ,शनिवार- अवांतर वाचन या स्वरुपात विषय मित्र द्वारे अध्यापनाचे काम सुरु झाले. कोव्हिड-19 या साथीची योग्य काळजी घेऊन व शासनच्या सूचनाचे पालन करून विषय मित्र मुलाचा अभ्यास घेऊ लागले .विषयमित्रांनी मुलांना शिकविणे ,मोठ्या बहिण भाऊ यांनी विषयमित्र बनून आपल्या छोट्या भाऊ बहिण,मित्र मैत्रिणीना शिकविणे,असे काम सुरु झाले. शिक्षकांच्या मदतीने, विषयमित्र यांच्या प्रत्यक्ष सहभागाने उपक्रमाला सुरुवात झाली. काही दिवसातच गावातील, बाहेरगावी शिकणारी मुले, आश्राम शाळा, इंग्लिश स्कूल, यात शिकणारी मुले ह्या उपक्रमात सहभागी झाली.

या उपक्रमास भरघोस प्रतिसाद मिळयाल्यानंतर फळा व खडूची मागणी वाढू लागली. खूप ग्रुप तयार झाल्यामुळे फळा व खडू कमी पडू लागले. परंतु त्यावर मात करून साहित्य उपलब्धता करून दिली. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी अडीच बाय अडीच चे टाकाऊ प्लायउड घेऊन त्यावर काळा रंग देऊन फळे तयार केले. गावातील शिक्षणप्रेमी व शाळा व्यवस्थापनाचे काही सदस्य यांनी मदत केली.प्रत्येक गटाला नवीन फळा ,खडू ,लेखन साहित्य दिले. विषय मित्र शिक्षक बनले.विषय मित्राच्या मदतीने मुले घरी स्वयंअध्ययन करू लागले.



पुण्य नगरी नंदुरबार

शेलवाईच्या जि.प.शाळेत निवडणूकीतून स्थापन झाले मंत्रीमंडळ

शेलवाई शाळेत 'मंगळवार आमचा - विज्ञानातील प्रयोगाचा' उपक्रम

पुण्यनगरी SMART नंदुरबार

करांडे गुरुजींच्या 'माझं अंगण हीच माझी शाळा' उपक्रमाला प्रतिसाद

विद्यार्थ्यांचे गट करून देण्यात येत आहेत शिक्षणाचे धडे; उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

गावातील शिक्षण प्रेमी यांना गुणवत्तेचे महत्त्व पटले तर शाळेसाठी सर्व प्रकारची मदत करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. घोड्यावद माता-पालक तसेच शिक्षक पालक समिती असो. सहभाग वाढवण्यासाठी सुरुवातीस दोन होतकरू सदस्यांना सोबत घेतले, एक सदस्य घोड्यावद (शिवपूर) ता. नंदुरबार मो.क्र.७५८८१४८७३८

## मंगळवार आमुचा विज्ञानातील प्रयोगाचा

शालेय जीवनातच विज्ञान प्रयोगाची गोडी आणि आवड मुलांना लागल्यामुळे मुले चौकस होतात आणि म्हणूनच प्रत्येक मंगळवारी आमच्या शाळेत विज्ञानातील प्रयोग, चला करून पाहू, बाल वैज्ञानिक यासारखे उपक्रम राबवले जातात. फेब्रुवारी महिन्यातील अशाच एका मंगळवारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार येथे विज्ञान विषयाच्या सहाय्यक असणाऱ्या श्रीमती अलका अशोक पाटील यांनी आज आमच्या शाळेस भेट देऊन या उपक्रमात सहभाग घेतला. यावेळी ... सदस्य वसंत वसावे, प्रवीण वळवी इतर गावकरी उपस्थित होते. उपस्थित गावकरी व पालक देखील आनंदाने उत्सुकतेने विद्यार्थी करत असलेल्या कृतींचे कौतुक करत होते.

**आमचा आवडीचा मंगळवार**

विज्ञानातील छोटे छोटे प्रयोग, विज्ञानातील बाल जादूगार, चला करून पाहूया इ. प्रकारचे उपक्रम या दिवशी शाळेत नियमितपणे राबवित असल्यामुळे मुलांसाठी मंगळवार हा दिवस खूप आवडीचा झाला आहे.

**बक्षीस**

... आहेत.

**अभ्यास तपासणी दिवस**

श्रीमती पाटील यांनी उपक्रमाला भेट दिलेल्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादर केलेले काही निवड प्रयोग खालीप्रमाणे

पाण्याच्या अवस्था, पेल्याच्या भोवतालच्या हवेत बाष्प, कागदी नळीने हवा भरणे, पाण्यात विरघळणारे व न विरघळणारे पदार्थ ओळख, मोबाईलद्वारे होकायंत्र, वनस्पतींना जगण्यासाठी पाण्याची गरज, पाण्याला रंग, वास, चव नसते, पारदर्शक व ...

## करांडे गुरूजी करतात विज्ञानाची आवड निर्मिती

तळोदा - मंगळवार आमुचा विज्ञानातील प्रयोगाचा उपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेलवाई येथील उपक्रमशील शिक्षक दशरथ करांडे राबविण्यात आहेत. लॉकडाऊन मुळे शाळा बंद पण शिक्षण सुरू आहे, कोव्हिड-१९ नियमाचे पालन करून विद्यार्थ्यापर्यंत जाऊन नाविन्यपूर्ण उपक्रमातून अध्ययन अध्यापन सुरू केले. विद्यार्थ्यांना गटागटात उपस्थित ठेवणे व मनोरंजनात्मक अभ्यास करून घेण्यासाठी प्रत्येक मंगळवारी रोजच्या अभ्यासासह शाळेत विज्ञानातील प्रयोग उपक्रम राबविला जात होता, चंद्र, मंगळावर पोहचलेल्या माणसाची संशोधांनाची भूक अजूनही शमलेली नाही याच अनुषंगाने शालेय विद्यार्थ्या मध्ये विज्ञानाची प्रयत्न करत आहोत. शालेय अभ्यासक्रमातील किंवा यू ट्यूब वरील सर्च केलेली विज्ञानातील छोटे छोटे प्रयोग सादरीकरण करणे, विज्ञानातील चला करून पाहू या कृती घरातील उपलब्ध साहित्याच्या मदतीने करून घेणे. विज्ञानांतील

लवाई शाळेतील शिक्षक दशरथ करांडे यांचा 'विद्यार्थी विज्ञानाशी मैत्री करुया' उपक्रम

TODAY

माझं घर अंगण, हीच माझी शाळा

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार

TODAY

माझं घर अंगण, हीच माझी शाळा

शेलवाईत शाळा बंद असताना उपक्रम; कल्पकतेचे सर्वत्र कौतुक

Feedback At ::

विविध वर्तमानपत्रातील कात्रणे

गावातील विषय मित्र आपला रिकामा वेळ देऊन विद्यार्थाचा अभ्यास घेतला. गावातील एका आजोबांनी विषयमित्रची भूमिका आपली नातवंडे व इतर मुलांना घेऊन बजावली. मुलांना त्याच्या आवडीचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन दिले. नातवांनी अभ्यास केला नाही तर आजोबांनी सरळ गुरुजीना फोन केले. बऱ्याच ग्रुपमध्ये मोठी भावंडे ही लहान भावंडाची विषयमित्र बनली. या सर्वांचा फायदा शाळा सुरु झाल्यावर निश्चितच आम्हाला झालेला दिसत आहे. कोरोना काळात विषय मित्र यांनी घर व अंगण हीच माझी शाळा हा उपक्रम यशस्वी केला.

**आदिवासी दुर्गम भागात कोरोना काळातील शालेय नेतृत्व भूमिका व विषय मित्र भूमिका -**

नियमित शाळा सुरू झाल्या की, विद्यार्थी आपल्याला कधी सुट्टी मिळेल किंवा कधी रविवार येतो याची आतुरतेने वाट पाहणारे तुम्ही आम्ही कधी खूप मोठ्या कालावधी साठी शाळा बंद होतील याची कल्पना देखील करू शकत नव्हतो परंतु कोरोना काळात मात्र शाळा बंद व शिक्षण सुरु ह्या नव्या प्रेरणेने अनेक चांगल्या बाबी शिक्षण क्षेत्रात घडून गेल्या.त्यात शालेय नेतृत्व यांनी विविध नाविन्यपूर्ण बाबी कोरोना काळात राबविल्या . आदिवासी दुर्गम भागात इंटरनेट समस्येमुळे येणारी आव्हाने सोडविण्यासाठी अनेक मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी शिक्षण सतत सुरू ठेवण्यासाठी ऑफलाईन च्या माध्यमातून विविध प्रयत्न केले आहेत ते खरच वाखाणण्याजोगे आहेत. शासनस्तरावरून ऑनलाइनच्या माध्यमातून सतत प्रयत्न सुरू आहेत. ज्या ठिकाणी ऑनलाइनची कोणतीही साधने उपयोगी ठरत नाही तेथील शिक्षकांनी घरोघरी जाऊन कृतीपत्रिका द्वारे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी मदत केली. काही सेवानिवृत्त शिक्षक, गावातील बीएड, डीएड, पदवी, पदव्युत्तर, शिक्षित पालक, मुले व वरच्या वर्गातील विद्यार्थी या सर्वांची मदत घेऊन कोरोना नियमांचे पालन करून मुलांना सतत शिकत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. विविध वर्गातील मुले गावातील शिक्षित वर्गाकडून शिकू लागली, म्हणून या मार्गदर्शक गटाला आपण “विषय मित्र” म्हणून संबोधले आहे. अनेक ठिकाणी विषय मित्रांना विविध प्रकारची नावे दिली आहेत त्यात कोणी त्यांना शिक्षक मित्र, शिक्षण मित्र असे म्हणतात. विषय मित्र/शिक्षण मित्र/ विद्यार्थी मित्र अशी वेगवेगळी नावे असली तरी सर्व शिक्षित मुलांचा ग्रुपचा एकच उद्देश मुलांना विविध गटात बसवून त्यांचा रोजचा अभ्यास घेणे. ही मुले विद्यार्थ्यांचे मित्र बनले ,वेगवेगळे विषय अध्यापन करू लागले म्हणून त्यांना आपण “विषय मित्र ” म्हणू लागलो. विषय मित्रांमुळे मुलांचे शिकणे सोपे झाले. एकमेकांच्या सहकार्याने मुले शिकू लागली, चर्चा करू लागली, उपक्रमात सहभागी होऊ लागली, चित्रकला, विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ इत्यादी आवडणाऱ्या विषयात विद्यार्थी मित्र कल्पकतेचा वापर करून अभ्यासपूरक उपक्रमांचे नियोजन करू लागले. स्वयंप्रेरणेने ही मुले कोविडच्या काळात काम करत होते. विषय मित्र हे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांचा अभ्यास घेत होते. विषय मित्र सकाळी अथवा सायंकाळी किंवा दुपारी साधारणपणे तीन तास अध्यापनाचे काम करीत होते.एकंदरीत विद्यार्थी बागा फुलविण्याचे काम शालेय नेतृत्व व विषय मित्रांनी केले.

**लोकसहभाग /समाजसहभाग/शालेय व्यवस्थापन समिती यांचा सहभाग –**

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम-2009मधील तरतुदीनुसार प्राथमिक शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती गठीत झाल्या आहेत. सदर समिती कडे शाळेच्या कामकाजाचे सनियंत्रण सोपविण्यात आले आहे.त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती शाळेचा आत्मा आहे असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही.कोविड काळात शाळा व्यवस्थापन समितींवर संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली होती. शालेय नेतृत्व

व व्यवस्थापन समिती यांनी कोविड काळात उत्तम कामगिरी केली.त्यात शाळा सुरु करून सामाजिक अंतराचे पालन, सेनीटायझर पुरवठा ,मास्क पुरवठा ,आवश्यक साहित्य साधने उपलब्ध करून दिली. पालकांमध्ये जाणीव जागृती केली.कोविड काळानंतर शाळा सुरु झाल्यावर शाळा कश्या सुरक्षित राहतील याबाबत पालकांना समजावून सांगून शिक्षक, मुख्याध्यापक यांना वेळोवेळी सहकार्य करून शाळेच्या अडीअडचणी सोडविण्यात शालेय नेतृत्वाला, शिक्षकांना सहकार्य करणेबाबत व्यवस्थापन समितीचे कार्य मोलाचे आहे.आवश्यक त्या ठिकाणी विषय मित्रांसोबतच ग्राम पंचायत निधी, समाज सहभाग घेऊन शालेय विकासाबाबत कामे पूर्ण करण्यात आली.

अशा प्रकारे नंदुरबार जिल्ह्यात विषयमित्र संकल्पनेचा वापर करून शाळांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गती वाढविण्याचा प्रयत्न केला.

**चिंतनात्मक प्रश्न -**

1)विषयमित्र ही संकल्पना विद्यार्थी शिकण्यासाठी उपयुक्त आहे. यावर आपले मत द्या.

2) या यशोगाथेचे श्रेय आपण कुणाला द्याल ?

3) **माझे घर व अंगण हीच माझी शाळा** असे नाव या उपक्रमास का दिले असावे?

**मोडूयलची शालेय नेतृत्वासाठी उपयुक्तता -**

1)ह्या मोड्यूल मधून कोविड काळात मुलांचे शिक्षण थांबू नये यासाठी मार्गदर्शन मिळते.
2) सकारात्मक दृष्टीकोन ठेवला कठीण समस्या सोपी होते.
3)सांघिक प्रयत्नातून समस्येवर मात मिळविता येते.
4)लोकसहभाग /समाज सहभाग यातून शिक्षण प्रक्रिया उन्नत करता येते.याबद्दल खात्री पटते.
5) शालेय नेतृत्व कल्पक ,परिश्रम घेणारे असेल व सर्व सहकारी साथ देणारे असले तर कठीण परिस्थितीवर मात करता येते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने मोड्यूल संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षण -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 भाग 1 शालेय शिक्षण यातील उपविभाग 2 मधील पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अध्ययनासाठी एक तातडीची आणि आवश्यक पूर्वअट यात सहाध्यायी कडून शिकणेबाबत भूमिका विषद केली आहे.यात सहाध्यायी कडून शिकण्याने मुलांना लवकर समजते.सहाध्यायी सोबत शिकणे हे समोरासमोर बसून अथवा इतर उपक्रमाच्या माध्यमातून होऊ शकते .स्थानिक आणि बाहेरच्या प्रशिक्षित स्वयं सेवकांनादेखील मोठ्या प्रमाणावरील या मिशन मध्ये सहभागी होता येईल,समुदायातील प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने जर एका विद्यार्थ्याला वाचायला शिकविण्याची जबाबदारी घेतली तर देशातील परिस्थिती झपाट्याने बदलेल..पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान वाढविण्यासाठी या देशव्यापी मिशनमध्ये अश्या सहाध्यायीकडून समोरासमोर बसून शिकण्याला आणि स्वयंसेवकाना प्रोत्साहन देण्यासाठी राज्ये नाविन्यपूर्ण मॉडेल्सची स्थापना करण्याचा विचार करु शकतात.तसेच इतर नाविन्यपूर्ण नवीन उपक्रम विद्यार्थाच्या मदतीसाठी सुरु करू शकतात .

समाजसेवक व समुपदेशक सर्व मुलांचे मानसिक आरोग्य अबाधित राखतील तसेच मुले शाळा सोडून जाणार नाहीत यासाठी पालकांना समुपदेशन करतील तसेच पायाभूत साक्षरता व अंकज्ञान संबधित धोरणाची उद्दीष्टे पारपाडण्यासाठी स्वयंसेवकांचा उपयोग करतील असेही नमूद आहे. थोडक्यात बालकांच्या शिकण्यातील सर्व अडथळे दूर करून प्रत्येक बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळेल यासाठीचा सर्वतोपरी प्रयत्न राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात केलेला दिसून येतो.

**संदर्भ साहित्य –**


1) शाळा बंद पण शिक्षण सुरु -you tube live episode dated 26th April 2020

2) कोरोना विषाणू आणि शिक्षण ,महाराष्ट्र टाइम्स,12/04/2020

3) www.hsph.harvadedu/fag  नेहमी विचारले जाणारे प्रश्न,Vishwanath lab

4) National education policy 2020

5) Right to education act 2009

6) SECRTM website pune

7) शाळा व्यवस्थापन समिती शासन निर्णय दि.17 जून 2010

8) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम- 2009

9) www.miepa.ac.in

10) www.maa.ac.in

11) www.ncert.nic.in

12) www.niepa.ac.in

13) policy for the implementation of corporate social responsibility(CSR)government resolution date-10 April 2015



**मोड्यूल विकसक**
डॉ.वनमाला पवार,
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,नंदुरबार

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद